# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १६/०१/२०२३ (सोमवार) सकाळ**

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील फुकट नगर कन्हान येथे दिनांक १४/०१/२०२३ चे २३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रविकांत रामदास कंडे, वय ४५ वर्षे, रा. चनकापुर कॉलोनी क्वार्टर नं २६/०१ खापरखेडा ता. पारशिवनी हे वेकोली उपक्षेत्र कामठी येथे गार्ड इंचार्ज असुन नमूद घटना वेळी व ठिकाणी स्टाफसह डब्लु. सी. एल. कामठी येथे पेट्रोलींग करीत असता त्यांना गुप्त माहीती मिळाली की, डब्लु. सी. एल. कामठी येथील झाडा झुडपात अवैध कोळसा आढळुन आले की, यातील आरोपी नामे— 1) योगेश हरीचंद्र प्रजापती, २) हर्षल श्रीराम केवल ३) आर्यन अशोक झोड ४) अमन सुखा बरमाते ५) राकेश पंडीत ६) देवदास सोनवने, सर्व रा. फुकट नगर कन्हान यांनी कोळसा कोणाला तरी विकण्यासाठी जमा करुन ठेवला असल्याची माहीती मिळाली असता सदर कोळसा पिकअप गाडीचे साहाय्याने कामठी ओसीएम काटयावर वजन करून वजन माप काढले असता त्याचे वजन ३२०० केजी भरले प्रति किलो ०८ रु. प्रमाणे असा एकुण २५६००/— रुपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त केला असुन तो मुद्देमाल कामठी कॉलेस्टीक येथे जमा करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पराग फुलझेले पो.स्टे कन्हान मो. क्र. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील टेकाडी शिवार येथे दिनांक १५/०१/२०२३ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रविकांत रामदास कंडे, वय ४५ वर्षे, रा. चनकापुर कॉलोनी क्वार्टर नं २६/०१ खापरखेडा ता. पारशिवनी हे वेकोली उपक्षेत्र कामठी येथे गार्ड इंचार्ज असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी आपल्या स्टाफसह डब्लु. सी. एल. कामठी येथे पेट्रोलींग करीत असता त्यांना गुप्त माहीती मिळाली की, तार फॅक्ट्री टेकाडी रोडकडे ८ ते ९ मोटरसायकल स्वार यांनी मोटरसायकलवर २ ते ३ बोरी अवैध कोळसा बांधुन नेत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून यातील मोटरसायकल क्र. MH 40 LE 8367 चा चालक आरोपी नामे— १) संजय बाबुलाल चव्हान, रा. इंदर कॉलनी मोटरसायकल क्र. MH 40 BD 3668 चा चालक आरोपी नामे— २) विनोद छोटुजी कुसुम रा. डुमर, मोटरसायकल क्र. MH 40 V 8877 चा चालक आरोपी नामे—३) अजय बाबुलाल चौव्हान, खदान नं ६ ४) अशोक केशवराव भोंदरे, रा. टेकाडी, मोटरसायकल क्र. MH 40 SR 6773 चा चालक आरोपी नामे—५) राजेश बिहारी हुडेलीया, मोटरसायकल क्र. MH 40 C 4435 चा चालक आरोपी नामे—६) अरुण हरीराज सहारे, रा. नवीन गोडेगाव, मोटरसायकल क्र. MH 31 BD 0556 चा चालक आरोपी नामे—७) भिमराव रामुजी हुमने, मोटरसायकल क्र. MH 40 T 9422 चा चालक आरोपी नामे— ८) ज्ञानसिंग पुरणसींग चौव्हान, रा खदान नं ६ सदर आरोपीतांनी कोळसा चोरी करुन नेत असतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करून वजन काटयावर वजन करुन मोजले असता २२३० किलो असा एकुण किंमती अंदाजे १७८४०/— रुपयाचा मुद्देमाल कामठी कॉलेस्टीक येथे जमा करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरजुसे पो. स्टे. कन्हान मो. क्र. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत जयभोले नगर वार्ड क्र. ०२ खापरखेडा येथे दिनांक १४/०१/२०२३ चे १८.००वा. ते १५/०१/२०२३ चे ०१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— धनराज शंकरराव ठाकरे, वय ५६ वर्ष, रा. जयभोले नगर वार्ड क्र .०२ खापरखेडा याने दोन काळया रंगाच्या बकऱ्या व दोन काळया रंगाच्या पाठी दिड महिन्याचे घरासमोरील गोठयात बांधुन ठेवले होते. त्या बकऱ्या किंमती अंदाजे १२,०००/—रू. च्या व दोन पाठी किंमती अंदाजे २०००/—रू. .च्या असा एकुण किंमती अंदाजे १४,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जानुसिंग जाधव पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**